एम. ए. भाग-१ राज्यशास्त्र : सत्र-२

Contemporary Political Theory and Issues

## घटक ४

# सामाजिक न्याय आणि नागरिकत्त्व

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्ट्ये:

४.१ प्रस्तावना:

४.२ विषय विवेचन

४.२.१ सामाजिक न्यायाचा अर्थ व स्वरूप

४.२.२ विस्थापन आणि नागरिकत्व

४.२.२.१ नागरिकत्वाची संकल्पना

४.२.२.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी

४.२.२.३ समान व सार्वत्रिक नागरिकत्व

४.२.२.४ विस्थापन अर्थ व स्वरूप

४.२.२.५ विस्थापन आणि नागरिकत्व

४.२.४ लिंगभाव आणि नागरिकत्व

४.२.४ नागरिकत्वावरील समकालीन चर्चाविश्व (सामाजिक-राजकीय-आर्थिक)

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये:

१. सामाजिक न्यायाचा अर्थ व स्वरूप समजून घेणे.

२. विस्थापन व नागरिकत्व यांतील सहसंबंध समजून घेणे.

३. लिंगभाव व नागरिकत्व यांतील सहसंबंध समजून घेणे.

४. नागरिकत्वावरील समकालीन चर्चाविश्वाचे आकलन करणे.

## ४.१ प्रस्तावना:

सामाजिक न्याय आणि नागरिकत्व या संकल्पनांना मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. तसेच या संकल्पनांना समकालीन काळातील चर्चा विश्वात अतिशय महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. मानवीजीवनाच्या विकासात अनेक कारणांमुळे लोकांचे विस्थापन घडून आले आहे. विस्थापित लोकांच्या नागरिकत्वाच्या अधिकारांवर प्रश्नचिन्ह निर्माण होताना दिसत आहे. तसेच समकालीन चर्चाविश्व नागरिकत्वाच्या विविध समस्यांशी निगडीत मुद्द्यांभोवती फिरताना दिसते. त्यामुळे या सर्वाचा एकत्रित आढावा घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत घटकात या सर्व मुद्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ सामाजिक न्यायाचा अर्थ व स्वरूप:

समाजातील सर्व घटकातील लोकांपर्यंत न्याय पोहोचत आहे किंवा नाही याची मीमांसा करत असताना आपण सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची चर्चा करत असतो. वास्तवात न्यायाच्या एकाच सिद्धान्ताच्या उपयोजनाची ही तीन क्षेत्रे आहेत. ही तिन्ही एकमेकांना पूरक आहेत, त्यामुळे परस्परांशिवाय अपुरी ठरतात.

विस्तृत अर्थाने, ‘सामाजिक न्याय’ शब्दावलीतून ‘सामाजिक, आर्थिक, राजकीय’ तिन्ही प्रकारच्या न्यायांचा बोध होतो. मर्यादित अर्थाने, ‘सामाजिक न्याया’चा अर्थ हा आहे की, सामाजिक जीवनामध्ये सर्व मनुष्यांची प्रतिष्ठा (Dignity) मान्य होईल; स्त्री-पुरुष, वर्ण वा जाती, धर्म, प्रदेश इत्यादींच्या आधारावर मोठा लहान वा उच्च-नीच न मानणे; शिक्षण व विकास करण्याची संधी सर्वांना समान मिळू शकेल; आणि सर्व लोक मानवीय नात्याने एकत्र येऊन साहित्य, कला, संस्कृती आणि तंत्रज्ञानाच्या साधनांचा उपभोग व उपयोग करू शकतील. जिथे विभिन्न पक्षकारांच्या परस्परविरोधी दाव्यांवर / मागण्यांवर विचार केला जातो तिथे ‘सामाजिक न्याया’चा विचार निर्बल व निर्धन पक्षकारांना विशेष सहायता आणि संरक्षण देण्याची मागणी करतो.

‘आर्थिक न्याय’ म्हणजे, उत्पादनाच्या प्रक्रियेत कोणी व्यक्ती दुसऱ्यांचे जीवन नियंत्रित करून आणि त्यांना अविवेकी अटींवर काम करण्याची शक्ती प्राप्त न करता सर्व लोकांना आपापल्या योग्यता व श्रमानुसार

रास्त मोबदला वा पुरस्कार प्राप्त करण्याची संधी मिळणे; बाजार व्यवस्थेमध्ये कोणा एका व्यवस्थेमध्ये कोणा एका व्यक्तीला आपल्या मनमानी अटींवर दुसऱ्यांना वस्तू व सेवा वाटप करण्याची सत्ता प्राप्त होऊ नये, तर सर्वांना आपापल्या क्षमता व गरजेनुसार रास्त अटींवर गरजेच्या वस्तू व सेवा मिळणे.

'राजकीय न्याया'चा अर्थ असा आहे की, सार्वजनिक धोरणांना निर्धारित करण्याच्या प्रक्रियेमध्ये सर्वांना प्रत्यक्षात सहभाग घेण्याची संधी व अधिकार मिळेल; सत्ता प्राप्त करण्याचा मार्ग सर्वांसाठी खुला असेल; सार्वजनिक सत्तेचा वापर सर्वांच्या कल्याणाचा विचार ध्यानात घेऊन केला जाईल; सर्व व्यक्तींना आपापल्या हितसंबंधांचे सिद्धीसाठी अथवा प्रत्येकाच्या समाजानुसार सार्वजनिक कल्याणाच्या सिद्धीसाठी आपल्या विचारांना अभिव्यक्त करण्याची, उपयुक्त संघटना बांधण्याची, सभा-संमेलने घेण्याची, दुसऱ्यांना समजावून सांगण्याचे इत्यादींचे पूर्ण स्वातंत्र्य असेल, आणि शांतता-सुव्यवस्था व नैतिक भावना यांना कसल्याही प्रकारची झळ न पोचविता भिन्न भिन्न व विरोधी विचारांप्रती सहिष्णुता पाहिली जाईल.

प्रस्तुत अर्थामध्ये 'राजकीय न्याय' 'स्वातंत्र्या'च्या आदर्शाला प्राथमिकता देतो; 'आर्थिक न्याय' 'समानता' च्या आदर्शाला महत्त्व देतो; आणि सामाजिक न्याय 'बंधुत्वा'च्या आदर्शाला मूर्त रूप देऊ इच्छितो. या तिन्हींना एकत्र आणण्यातूनच सामाजिक जीवनात न्यायाच्या बृहत आदर्शाची सिद्धी केली जाऊ शकते.

सामाजिक न्यायाची मागणी हे आधुनिक युगाचे एक वैशिष्ट्य आहे. टॉम बॉटोमोरने 'क्लासेस इन मॉडर्न सोसायटी' (१९६५) या ग्रंथात लिहिले आहे की, संस्कृतीच्या इतिहासामध्ये संपत्ती, पद-प्रतिष्ठा आणि सत्ता यांमधील विषमता प्रामुख्याने अशा स्थितीच्या स्वरूपात स्वीकृत केल्या गेल्या आहेत ज्यांमध्ये कसल्याही पद्धतीचे परिवर्तन संभव नाही. अठराव्या शतकामध्ये जेव्हा अमेरिकी व फ्रान्सच्या क्रांतींनी या परिस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याची प्रेरणा दिली, तेव्हा कोठे सामाजिक वर्गव्यवस्था विषमतेची जिवंत उदाहरण आहे हे दिसून आले. यावर मोठ्या प्रमाणात विवाद झाला, आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून याला आव्हान दिले गेले. तेव्हा अशा पद्धतीच्या घोषणांची निर्मिती केली गेली- सर्व मनुष्य जन्मतः वा निसर्गतः स्वतंत्र आहेत; त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव फक्त सार्वजनिक उपयुक्ततेच्या आधारावरच स्वीकारला पाहिजे. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेतूनच अधिकारांच्या पुनर्व्यवस्थेच्या व्यापक अर्थाने, सामाजिक न्यायाचा हा मूलमंत्र आहे की, संघटित सामाजिक जीवनातून जे काही लाभ प्राप्त होतात, ते काही मोजक्या लोकांच्या हातामध्ये केंद्रित न होता सर्वसामान्य व्यक्तींना- विशेषत: निर्बल निर्धन वर्गांना त्यात रास्त वाटा मिळावा जेणेकरून ते सामान्यतः सुखी, सन्मानपूर्ण आणि निश्चित जीवन जगू शकतील. सामाजिक न्यायाची मागणी आहे की, आय आणि संपत्ती यांचा संबंध विशेषाधिकार, परंपरा वा वंशपरंपरा यांच्याशी नाही तर श्रम कर्तव्यपालनाशी असला पाहिजे. संपत्तीचा अधिकार तोपर्यंतच मान्य झाला पाहिजे जेव्हा खाजगी संपत्ती श्रमाच्या मोबदल्यातून बचत केलेली असेल, आणि खाजगी संपत्ती व्यक्तीचे सुख व कार्यक्षमता यांमध्ये वृद्धी करण्यासाठी आवश्यक असेल. जेव्हा संपत्तीचा श्रमाशी संबंध प्रस्थापित होईल तेव्हा भयंकर अशी आर्थिक विषमता आपोआपच संपुष्टात येईल. याचा दुसरा परिणाम असा की, जी व्यक्ती आपल्या क्षमतेनुसार श्रम करत नाही, त्याला फक्त संपत्तीचा अधिकारच नाही तर जीवन जगण्याचा सुद्धा

अधिकार राहणार नाही. निर्बल, अपंग व असहाय लोकांची बाब निराळी आहे, ज्यांना मानवतावादी भावनेच्या आधारावर जगण्याचा अधिकार अवश्य दिला पाहिजे.

आर्थिक विषमता संपुष्टात आल्यानंतर सामाजिक संपत्ती कोणा एका वर्गाच्या हातातली कठपुतळी राहणार नाही तर ती समाजाची सेविका बनेल; तेव्हा खऱ्या अर्थाने लोकशाहीची प्रस्थापना होऊ शकेल. कारण तेव्हा निवडणुका जनतेचा विश्वास संपादन करून जिंकल्या जातील, पैशाच्या ताकदीने नाही. तेव्हा शिक्षण आणि आत्मविकास यांच्या संधी सर्वांना समान स्वरूपात प्राप्त होऊ शकतील; पैशावाल्यांसाठी विशिष्ट संस्था ठेवल्या जाणार नाहीत. तेव्हा न्यायालयांमधील खटले फक्त तेच लोक जिंकणार नाहीत जे पैशाच्या आधारावर सर्वात जास्त प्रतिभाशाली वकिलाला आपली बाजू मांडण्यासाठी उभे करतील, तर निर्धन व निर्बल पक्षकारांना सुद्धा पूर्ण न्याय मिळेल. तेव्हा काळ्या बाजारातील ठेकेदार आपल्या दातृत्वाचं ढोंग करून भोळ्याभाबड्या जनतेचा जयजयकार मिळवू शकणार नाहीत तर कोणाला कोणाच्या दानावर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही. तेव्हा समाजामध्ये जे काही उत्पादन होईल वा ज्या सेवा निर्धारित केल्या जातील त्या 'जनताजनार्दनाच्या गरजांना समोर ठेवूनच निर्धारित केल्या जातील, भांडवलदारांचे खिसे भरण्यासाठी नाही, तेव्हा सामाजिक न्याय एक कल्पितादर्श वा एक राजकीय घोषणा न राहता त्याची सामाजिक वास्तवात प्रस्थापना झालेली असेल.'

सामाजिक जीवनात न्यायाची प्रस्थापना समजून घेत असताना न्यायाचे प्रक्रियात्मक न्याय आणि कायदेशीर न्याय हे पहिले समजून घ्यावे लागतात.

प्रक्रियात्मक न्यायाचे स्वरूप कायदेशीर औपचारिक न्यायाशी जुळते तर तात्विक न्यायाचा विचार सामाजिक न्यायाशी जुळताना दिसतो. प्रक्रियात्मक न्याय उदारमतवादावर भर देतो. आणि त्यानुसार न्यायाचं कार्य व्यक्ती किंवा समूहांमधील परस्पर संबंध नियमित करणे हे आहे. प्रक्रियात्मक न्यायाच्या पुरस्कार करणाऱ्या विचारवंतांमध्ये हरबर्ट स्पेन्सर, एस ए हायेक, मिल्टन फ्रीडमन, रॉबर्ट नोझिक यांचा समावेश होतो. याशिवाय,

जॉन रॉल्स याने प्रक्रियात्मक न्यायाला सामाजिक न्यायाच्या तत्त्वाशी जोडून न्यायाचा व्यापक सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न केला. रॉल्सच्या मते, अशा समुदायातील लोक न्यायाच्या पुढील तत्त्वांचा पुरस्कार करतील.

(१) प्रत्येक व्यक्तिला समान हक्क असतील, तसेच इतरांच्या बरोबरीने पूर्ण स्वातंत्र्य असेल.

(२) सामाजिक व आर्थिक विषमतांची अशा रीतीने पुन्हा मांडणी करण्यात यावी की– (अ) सर्वाधिक दुर्बल घटकाला जास्तीत जास्त लाभ मिळावा, आणि (ब) सर्व पदे सर्वांसाठी खुली असावीत. तसेच त्यांना प्राप्त करण्यासाठी सर्वांना 'समान संधी' प्राप्त असावी.

रॉल्सच्या मते, एका व्यक्तिच्या स्वातंत्र्याचा बळी घेऊन दुसऱ्याला स्वातंत्र्य असू नये. तसेच केवळ सर्वाधिक दुर्बल घटकाच्या लाभासाठीच समतेच्या तत्वाचे उल्लंघन होऊ शकेल.

प्रक्रियात्मक न्यायाच्या उलट तात्विक वा सामाजिक न्यायाचा समकालीन विचार समाजवादाची जोडला गेला आहे. प्रक्रियात्मक न्यायाच्या उलट, तात्त्विक वा सामाजिक न्यायाचा समकालीन विचार समाजवादाशी जोडला गेला आहे. सामाजिक न्यायाचे समर्थक हे मानतात की, जोपर्यंत समाज संपत्ती, उत्पादनाची साधने व सामाजिक जीवनातून प्राप्त होणाऱ्या लाभांचे वितरणावर आपले नियंत्रण प्रस्थापित करत नाही तोपर्यंत या वितरणाला न्यायाधिष्ठित बनविले जाऊ शकत नाही. आर्थिक जीवनामध्ये खुली स्पर्धा अशी विषमता निर्माण करते, ज्यामध्ये निर्धन वर्ग श्रीमंत वर्गाद्वारा निर्धारित होतो. सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनामध्ये सुद्धा निर्धन वर्गाला हीन परिस्थितीचा सामना करावा लागतो. त्यामुळेच न्यायाचे उद्दिष्ट कायद्याच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रांतील अयोग्य विषमतांचा समूळ नाश करणे हे आहे. याचा अर्थ हा आहे की, ज्या व्यक्ती वा समूह या विषमतांमुळे स्वातंत्र्य किंवा आत्मविकास यांपासून वंचित राहिलेल्या आहेत, अशा व्यक्ती व समूहांच्या हित रक्षणासाठी विशेष व्यवस्था केली जावी. सामाजिक न्यायाची ही मागणी आहे की, विकासाचे लाभ काही मोजक्या लोकांनाच फक्त मिळू नयेत तर त्या लाभांचा फायदा समाजातील अभावग्रस्त, दीन-हीन, वंचित व कमजोर स्तरांपर्यंत पोहोचण्याची व्यवस्था केली गेली पाहिजे.

### ४.२.२ विस्थापन आणि नागरिकत्व:

विस्थापन आणि नागरिकत्वाचा सहसंबंध समजून घेण्यासाठी प्रथम नागरिकत्वाची संकल्पना तसेच विस्थापन म्हणजे काय ते समजून घेऊ.

#### ४.२.२.१ नागरिकत्वाची संकल्पना:

नागरिकत्वाच्या संकल्पनेला राज्यशास्त्रात प्रदीर्घ इतिहास आहे. राज्यशास्त्रामधील चर्चा विश्वामध्ये नागरिकत्व हा महत्त्वाचा मुद्दा राहिला आहे. प्राचीन ग्रीक काळ, आधुनिक राष्ट्र राज्य आणि भविष्यातील विश्वराज्य या प्रत्येकच टप्प्यामध्ये नागरिकत्वाची चर्चा आणि त्याचे विविध आयाम यांची चर्चा होत राहिली व कायम राहणार आहे. या संकल्पनेच्या विकासात जी अधिकाधिक व्यापक, सकारात्मक आणि समावेशक होत गेली आहे.

नागरिकत्वाची संकल्पना पहाण्यापूर्वी आपण प्रजाजन आणि नागरिक यातील फरक समजून घेऊ. ज्या राज्यव्यवस्थेत राजेशाही शासन असते, राजाच्या इच्छेनुसार कारभार चालतो. संविधान अस्तित्वात नसते म्हणजेच संविधानाच्या माध्यमातून व्यक्तींना हक्कही प्रदान केले गेलेले नसतात. तेंव्हा तेथील जनता ही प्रजाजन या संज्ञेला पात्र असते. या उलट संविधानाद्वारे व्यक्तिंना निश्चित हक्क प्रदान केले जातात, त्या हक्कांचा उपयोग करून व्यक्तींना राज्यकारभारात सहभागी होता येते अशा राजवटीतील व्यक्तींना नागरिक हा दर्जा लाभलेला असतो.

नागरिकत्व म्हणजे, अशी अवस्था ज्यामध्ये व्यक्ती विशिष्ट राजकीय समुदायाचा (Political community) पूर्ण व जबाबदार सदस्य असते, आणि सार्वजनिक जीवनामध्ये (Public life) सहभागी होत असते. नागरिक ही अशी व्यक्ती आहे जी राज्यसंस्थे (State) प्रति पूर्ण निष्ठा बाळगत असते व तिला

राज्यसंस्थेचे संरक्षण (Protection) प्राप्त होत असते. नागरिकत्वाच्या विचाराला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे परंतु आधुनिक काळात ही संकल्पना राष्ट्र राज्याअंतर्गत (State) व्यक्तीला असणाऱ्या दर्जा वा स्थानाशी संबंधित असते.

**४.२.२.२ नागरिकत्वाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

प्राचीन ग्रीक आणि रोमन राज्य व्यवस्थेमध्ये नागरिकत्व ही कल्पना प्राथमिक स्वरूपात पहावयास मिळते. अर्थात प्राचीन ग्रीक आणि रोमन राज्यव्यवस्था आजच्या आधुनिक लोकशाही राज्यव्यवस्थेपेक्षा वेगळ्या होत्या. ग्रीक नगर राज्यांमध्ये राज्यातील केवळ काही व्यक्तींना स्वतंत्र व्यक्ती म्हणून दर्जा होता आणि त्यांनाच संपूर्ण नागरिक म्हणून अधिकार प्राप्त होते. आणि समाजातील इतर घटकांना म्हणजेच गुलाम स्त्रिया आणि परकीय व्यक्ती यांना नागरिकत्वाचे अधिकार नव्हते. रिस्टॉटलच्या विचारांमध्ये देखील नागरिकत्व हा शासनकर्त्या वर्गाचा विशेष अधिकार होता. ग्रीक राजकीय परंपरेतील नागरिकत्वामध्ये नागरिकांच्या कर्तव्याला महत्त्व होते आणि नागरिकांनी त्यांचे कर्तव्य पार पाडणे त्यांच्या सुरक्षित सुखी आयुष्यासाठी आवश्यक होते.

ग्रीक गरीब नगर राज्यांच्या ऱ्हासानंतर रोमन साम्राज्यामध्ये नागरिकत्वाची संकल्पना पुढे विकसित झाली. सर्वप्रथम येथेही नागरिकत्व हे सत्ताधारी वर्गापुरते मर्यादित होते. परंतु नंतर त्याची व्याप्ती सामान्य लोक आणि युद्धामध्ये जिंकलेले लोक यांच्यापर्यंत विस्तारली. केवळ समाजातील सर्वात कनिष्ठ स्तरातील लोक आणि स्त्रिया यांना नागरिकत्वाच्या लाभांपासून वगळले गेले.

मध्ययुगीन युरोपमध्ये राजकीय अधिसत्ता चर्चच्या प्रभावाखाली आली. त्यामुळे लौकिक  नागरिकत्वाचे महत्व कमी झाले. पंधराव्या आणि सोळाव्या शतकामध्ये पुनर्जागरणाच्या काळात आधुनिक विचारांच्या उदया बरोबर इटलीतील प्रजासत्ताकामध्ये नागरिकत्वाला पुन्हा केंद्रीभूत महत्व प्राप्त झाले. इटलीचा विख्यात विचारवंत निकोलो मकियाव्हेली (१४६९-१५२७) यांनी या विचाराला नवीन स्वरूप प्राप्त करून दिले. पुढे सतराव्या शतकात इंग्लंडमध्ये जेम्स हैरिंग्टन (१६११-७७) आणि जॉन मिल्टन (१६०८-७४) यांनी या संकल्पनेची पुर्नमांडणी केली. हैरिंग्टनने आदर्श व्यवस्थेत कायद्याचे साम्राज्य असेल मनुष्याचे नाही (An empire of Laws not Men) असे प्रतिपादित केले. इंग्लंडमधील गौरवशाली क्रांतीच्या (Glorous Revolution) (१६८८) समर्थकांनी नागरिकत्वाचा विचार विशेषत्वाने लोकांपर्यंत पोहोचवला. अठराव्या शतकात अमेरिकेत क्रांतीच्या (१७७६) वेळी हा विचार व्यापक प्रमाणात लोकप्रिय झाला.

१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांती आणि त्याचा परिणाम म्हणून मिळालेल्या मानवाचे आणि नागरिकांचे अधिकारांचा जाहीरनामा या माध्यमातून नागरिकत्वाच्या कल्पनेने उंचीचे शिखर गाठले. हा जाहीरनामा म्हणजे रुसोच्या (१७१२-७८) विचारांचे  प्रतिबिंब होता. रुसोने त्याच्या सामाजिक करार (१७६२) या ग्रंथामध्ये नागरिक हा स्वतंत्र आणि स्वायत्त व्यक्ती आहे असे लिहिले होते. युरोपमध्ये व्यावसायिक समाजाचा उदय पाहता व्यक्ती हित आणि सामूहिक हित यांमधील संघर्षाची जाणीव त्याला झाली होती. यामुळे सामाजिक ऐक्याला आव्हान निर्माण होऊ शकते. म्हणून रुसोने हेतूपूर्वक खाजगी हितापेक्षा सामूहिक ईहेला महत्त्व दिले.

एकोणिसाव्या शतकात उदारमतवादाच्या विकासामुळे नागरिकत्वाच्या कल्पनेला नवीन चालना मिळाली. या कालखंडात नैसर्गिक हक्क हे नागरिकत्वाच्या कल्पनेचा आधार मानले जाऊ लागले. इंग्लंडमध्ये जॉन लॉक (१६३२-१७०४) यांनी नैसर्गिक अधिकारांची कल्पना मांडली. जीवन स्वातंत्र्य आणि मालमत्तेचा अधिकार हा नैसर्गिक हक्कांचा मुख्य आधार असल्याचे लॉक यांनी मत मांडले. या अधिकारांच्या संरक्षणासाठी नागरिकांनी राज्य स्थापन केले. जर राज्य या अधिकारांचे संरक्षण करण्यात अयशस्वी ठरले, तर व्यक्ती राज्याविरुद्ध त्याच्या 'प्रतिकारचा अधिकार' वापरण्यास स्वतंत्र असेल. पुढे नकारात्मक अधिकार आणि सकारात्मक अधिकार या संकल्पना विकसित झाल्या ज्यामुळे नागरिकत्वाच्या संकल्पनेत भर पडली. राज्यातील व्यक्तीच्या काही क्रिया कलापांवर बंधन नसणे म्हणजे नकारात्मक अधिकार तर जेव्हा राज्य एखाद्या व्यक्तीला त्याच्या स्वयंविकासासाठी पाठिंबा देते तेव्हा त्याचे असणारे अधिकार म्हणजे सकारात्मक अधिकार. अशाप्रकारे समकालीन काळामध्ये नागरिकत्वाचा विस्तार हा राज्यातील प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने राज्याने उपलब्ध करून दिलेले अधिकार या माध्यमातून अधिकाधिक व्यक्तींपर्यंत तो पोहोचताना दिसतो.

**४.२.२.३ समान व सार्वत्रिक नागरिकत्व:**

टी. एच. मार्शल यांनी Citizenship and Social Class (१९५०) या ग्रंथात नागरिकत्वाची 'राजकीय समुदायाचे परिपूर्ण आणि समान सदस्यत्व' अशी व्याख्या केली आहे. त्यांनी इंग्लंड मधील नागरिकत्वाच्या विकासाचा अभ्यास केला. मार्शल यांनी त्यांच्या ग्रंथात नागरी, राजकीय आणि सामाजिक अशा तीन प्रकारच्या अधिकारांचे वर्णन केले आहे.

**१) नागरी अधिकार:** नागरी अधिकारांमध्ये भाषण स्वातंत्र्य, संचारस्वातंत्र्य, कायद्यासमोर समानता आणि मालमतेचा अधिकार यांचा समावेश होतो.

**२) राजकीय अधिकार:** राजकीय अधिकारांमध्ये मतदानाचा अधिकार, निवडणूक लढविण्याचा अधिकार, सार्वजनिक पद धारण करण्याचा अधिकार, इ. समाविष्ट होतात. त्यामुळे नागरिकास राजकीय जीवनात सहभागी होता येते. राजकीय अधिकार प्राप्त होण्यासाठी सार्वत्रिक मताधिकार, राजकीय समता आणि लोकशाही शासनव्यवस्था असणे आवश्यक आहे.

**३) सामाजिक अधिकार:** सामाजिक अधिकारांमुळे व्यक्तिला किमान सामाजिक दर्जा प्राप्त होतो तसेच राजकीय व नागरी अधिकारांना आधार प्राप्त होतो.

मार्शलने नागरिकत्वाची 'राजकीय समुदायाचे परिपूर्ण आणि समान सदस्यत्व' अशी व्याख्या केली आहे. या व्याख्येत आधुनिक नागरिकत्वाची दोन लक्षणे दिसून येतात.

(अ) वर्णव्यवस्थेतील विषमता समूळ नष्ट करून सर्वांना समानतेचा दर्जा देणे, आणि,

(ब) समाजातील अनेक वंचित असलेल्या आणि व्यवस्थेबाहेर असणाऱ्या गटांना वा समूहांना नागरिकत्वाच्या व्यापक होत असणाऱ्या कक्षेत सामावून घेणे. यामुळे समाजात एकात्मतेचे कार्य साधले जाते.

अशा प्रकारच्या नागरिकत्वामुळे राजकीय समाजाची एक राष्ट्रराज्य म्हणून ओळख प्रस्थापित होते. तसेच राज्यात एक समान राष्ट्रीय संस्कृती आणि सामाजिक वारसा निर्माण होतो. नागरिकत्वामध्ये समानतेचे तत्त्व मान्य केल्यामुळे संस्कृती, जाती, लिंग, धर्म, वंश इ. आधारांवर असलेल्या भेदभावांचे अस्तित्व नाकारले जाते. राज्याची भूमिका निरपेक्ष व तटस्थ असून ते सर्व नागरिकांना समान वागणूक देते. कोणत्याही आधारावर भेदभाव न करता सर्वांना समान अधिकार असतात आणि सर्वांना राज्याचे समान संरक्षण प्राप्त होते.

वरील विवेचनाप्रमाणे समकालीन काळामध्ये नागरिकत्व हे त्या राज्याच्या सदस्यांना मिळणाऱ्या अधिकारांची निगडित आहे. आज या नागरिकत्वाच्या संकल्पनेचा विस्तार होऊन यामध्ये राज्यांमधील प्रत्येक व्यक्तीचा कोणत्याही आधारावर भेदभाव न करता समान पद्धतीने समावेश केला गेला असला तरीही प्रत्यक्षात अनेकदा अनेक कारणांमुळे समाजातील अनेक घटक नागरिकत्वाच्या लाभांपासून दूर राहताना किंवा वंचित राहताना दिसतात. यामधीलच एक कारण म्हणजे मानवी विस्थापन. वरील मुद्द्यांमध्ये नागरिकत्वाचा अर्थ आणि त्या संकल्पनेचा विकास जाणून घेतला आता नागरिकत्व आणि मानवी विस्थापन यामधील सहसंबंध समजून घेण्याचा प्रयत्न करू.

४.२.२.४ **विस्थापन अर्थ व स्वरूप:**

सर्वप्रथम मानवी विस्थापन म्हणजे लोकांची त्यांच्या घरापासून किंवा मूळ देशातून सक्तीने झालेली हालचाल. विस्थापनाचा अर्थ सक्तीचे स्थलांतर असाही घेतला जातो. सखोल दृष्टीने पहाता विस्थापनामध्ये लोकांचे पिढ्यानुपिढ्या भावनिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक प्रक्रियेभोवती विणलेले संसार उध्वस्त केले जातात. विस्थापन हा मानसिक स्थितीला धक्का असून विस्थापितांना नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपभोगापासून वंचित ठेवले जाते. शास्त्रज्ञांनी केलेल्या विस्थापनाच्या व्याख्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

**जोन्स मुरकिन आणि जॉर्ज** यांच्या मते विस्थापन अशी संकल्पना आहे की, 'विकास प्रकल्पाकरिता लोकांना त्यांच्या मूळ स्थानावरून हलविले जाते.'

**कॉलीन्स शब्दकोशाप्रमाणे,** 'लोक ज्या क्षेत्रात राहतात तिथून लोकांना जबरदस्तीने पाठवणे म्हणजे विस्थापन होय.'

विस्थापन हे अनेक घटकांमुळे व कारणांमुळे होऊ शकते. यामध्ये प्रामुख्याने तीन प्रकार पाहता येतात.

**१) आपत्ती प्रेरित विस्थापन:** आपत्ती प्रेरित व्यवस्थापन नैसर्गिक आपत्तीच्या श्रेणीत येणारी कोणतीही गोष्ट आपत्ती प्रेरित व्यवस्थापनास कारणीभूत ठरू शकते. सर्वसाधारण नैसर्गिक आपत्तींच्या उदाहरणांमध्ये उष्ण कटिबंधीय चक्रीवादळे, हिम वादळे, हिमस्खलन, भूकंप, पूर, भूस्खलन, उष्णतेच्या लाटा, सुनामी,

ज्वालामुखीचा उद्रेक आणि जंगलातील आग यांचा समावेश होतो. समुद्र पातळी वाढण्याच्या शक्यता तसेच वाढत्या जागतिक तापमानाचा परिणाम अधिक शक्तिशाली आणि आपत्तीजनक हवामानाशी संबंधित आपत्तींमध्येही झाला आहे.

हैयान या चक्रीवादळाने ७ नोव्हेंबर २०१३ रोजी फिलीपिन्समध्ये धडक दिली. हैयान हे भूभागावर आदळले असे सर्वात शक्तिशाली वादळ म्हणून नोंदवलेले गेले आहे. टायफून, आणि चक्रीवादळे उबदार पाण्याच्या तापमानापासून जास्त शक्ती निर्माण करतात. त्यातच हवामान बदलाचा मुद्दा पुन्हा एकदा चिंतेचा विषय बनला आहे. जागतिक तापमान वाढीबरोबरच  पाण्याचे तापमानही वाढते. यामुळे जगभरात सतत तीव्र वादळांची नोंद केली जाईल. या वादळाचा परिणाम म्हणून ४.१ दशलक्षाहून अधिक लोक तात्पुरते किंवा कायमचे विस्थापित झाल्याचा संयुक्त राष्ट्रसंघाचा अंदाज आहे. याच अहवालात असा अंदाज आहे की केवळ २०१३ मध्ये हवामान, हवामानाशी संबंधित घटना आणि नैसर्गिक आपत्तींमुळे २२ दशलक्षाहून अधिक लोक विस्थापित झाले होते.

**२) संघर्ष प्रेरित विस्थापन:** अनेकदा मानवी संघर्षामुळे लोकांना त्यांच्या मुळ प्रदेशापासून दूर जावे लागते. किंवा तसे करण्यास भाग पाडले जाते. म्हणजेच हे संघर्ष मानवी विस्थापनास कारणीभूत ठरतात.

सिरिया मधील गृहयुद्धाचा परिणाम म्हणून शेजारील देशांमध्ये मोठ्या संख्येने निर्वासित आणि अंतर्गतरित्या विस्थापित व्यक्तींमध्ये झाला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या च्या अंदाजानुसार २.५ दशलक्ष निर्वासित शेजारच्या देशांमध्ये राहत आहेत तर ६.५ दशलक्ष या संघर्षामुळे देशांतर्गत विस्थापित झाले आहेत. ही एकत्रित संख्या सीरियाच्या युद्धपूर्व लोकसंख्येच्या ४०% आहे. जगभरात असा अंदाज आहे की सध्या संघर्षामुळे ५१.२ दशलक्ष लोक विस्थापित झाले आहेत. यामध्ये १६.७ दशलक्ष निर्वासित, ३३.३ दशलक्ष अंतर्गत विस्थापित आणि १.२ दशलक्ष आश्रय शोधत आहेत.

कॅनडात प्रथम युरोपियन स्थायिक आल्यापासून कॅनडातील आदिवासी लोकसंख्येचे संघर्ष प्रेरित विस्थापनास घडून आले आहे. वसाहतवादाच्या काळात कॅनडामध्ये येणाऱ्या युरोपियन स्थायिकांच्या मोठ्या ओघामुळे आदिवासींना अंतर्गतरित्या विस्थापित करण्यात आले. त्यांना त्यांच्या पारंपारिक प्रदेशांमध्ये प्रवेश नाकारण्यात आला आणि अनेक प्रकरणांमध्ये त्यांच्यासाठी वसाहती अधिकार्यांनी निवडलेल्या नवीन ठिकाणी जाण्यास भाग पाडले गेले. या नवीन युरोपियन वसाहतींकडे असलेल्या नवीन तंत्रज्ञान आणि आर्थिक आणि लष्करी सामर्थ्य यांच्याशी आदिवासी लोकसंख्या जुळवून घेऊ शकली नाही.

अशाप्रकारे विविध मानवी संघर्षांमुळे स्थानिक लोकांचे विस्थापन होताना दिसते आणि त्यांना त्यांच्या मुळ प्रदेशावरील हक्क नाकारला जातो.

**३) विकास प्रेरित विस्थापन :** चीनमधील थ्री गॉर्जेस धरण जे यांगत्झी नदीवर पसरले आहे ते विकासाचे एक उदाहरण आहे ज्याने मोठ्या संख्येने लोक विस्थापित केले आहेत. या धरणाच्या बांधकामामुळे विस्थापित झालेल्या लोकांची अधिकृत संख्या १.२ दशलक्ष आहे. ही अधिकृत संख्या

असली तरी ही संख्या जास्त आहे असा अंदाज वर्तवण्यात आला आहे, काही अंदाजानुसार या धरणाच्या बांधकामामुळे विस्थापित झालेल्या लोकांची एकूण संख्या ६ दशलक्ष च्या जवळपास आहे.

औद्योगिक प्रकल्पाकरिता पाणी, पिण्याचे पाणी, जलविद्युत प्रकल्प आणि कृषी सिंचनाकरिता मोठमोठी धरणे बांधली जातात. फ्रांसमधील लाईर नदीवरील धरण प्रकल्प, थायलंडमध्ये चाओ धरण प्रकल्प, आस्ट्रेलियातील पेंडर धरण प्रकल्प, अमेरिकेतील ओरगॉन धरण प्रकल्प, चीनमधील पांग धरण, जपानमधील नागरा धरण प्रकल्प इत्यादी मोठे धरण प्रकल्प आणि भारतात पंजाबमध्ये भाक्रा नांगल प्रकल्प, केरळमध्ये सायलेट व्हॅली धरण प्रकल्प, कर्नाटकमधील तुंगभद्रा सिंचन प्रकल्प, गुजरातमधील सरदार सरोवर प्रकल्प, पश्चिम बंगालमध्ये दामोदर खोरे योजना, महाराष्ट्रातील जायकवाडी, गोसीखुर्द धरण प्रकल्प, लोअर वेणा प्रकल्प व पेंच प्रकल्प बांधण्यात आले. म्हणजेच जगातील प्रत्येक देशात विकासाकरिता मोठमोठी धरण प्रकल्प बांधण्यात आले. सर्वात जास्त चीनमध्ये ४५% धरणे बांधली आणि सर्वात कमी भारतात ९% धरण प्रकल्प बांधण्यात आले. परंतु विकासात्मक धरण प्रकल्पांमुळे करोडो कुटुंब विस्थापित झाले. भारतात गुजरातमधल्या सरदार सरोवरामुळे २ लाख लोक विस्थापित झाले आहेत. केंद्रीय जल आयोगानुसार ३६,००० मोठे धरण प्रकल्प बांधले आहेत आणि या धरण प्रकल्पांमुळे जवळपास ९ कोटी लोकांना विस्थापित केले आहे.

औद्योगिक विकासाकरिता मोठमोठे औद्योगिक प्रकल्प उभारण्यात आले. लाखो एकर जमीन ताब्यात घेऊन अनेक गावातील लोक विस्थापित झाले. १९९१ च्या नोंदीनुसार भारतात ३३६ लहान-मोठे फक्त कागद उत्पादन करणारे कारखाने होते. या कारखान्याकरिता हजारो एकर जमीन व जवळपास १ लाख लोक विस्थापित झाले. आशिया खंडातील सर्वात मोठा औद्योगिक प्रकल्प बुटीबोरी (नागपूर) उभारण्यात आला. या प्रकल्पाकरिता हजारो एकर जमीन ताब्यात घेतली. ४५० कुटुंब विस्थापित झाले. परंतु शेतकऱ्यांची घेतलेली जमीन काही कारखानदारांनी विकून नफा कमविला. परंतु विस्थापित लोकांचे प्रश्न कायम आहेत. नागपूरजवळ कार्गो हब प्रकल्पाकरिता शेकडो जमीन ताब्यात घेतली आणि शेकडो कुटुंब विस्थापित झाली. उत्तर प्रदेशातील आग्रा-कानपूर दरम्यान अनेक चामडी उद्योग आहेत. या उद्योगांनी जवळपास ८०,००० लोकांना विस्थापित केले. राऊरकेला स्टिल प्लांटमुळे ३२ गावातील जवळपास १५ हजार लोकांना विस्थापित व्हावे लागले आहे. मिलाई स्टिल प्लांटमुळे १४ गावातील ७ हजार लोक विस्थापित झाले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात कोळसा व युरेनियम खाणीद्वारे उत्खनन सुरू झाले. झारखंड राज्यात २२६ कोळसा खाणी आहेत. तज्ञांच्या मते, ओपन कास्ट माईन्समध्ये मोठ्या प्रमाणात जमिनी जातात. त्यामुळे तेथील लोक विस्थापित होतात. नागपूरजवळ उमरेड, पिपळा, खापरखेडा व सावनेर इत्यादी ठिकाणी कोळसा मॅंगनीजच्या खाणीमुळे हजारो लोक विस्थापित झालेले आहेत. भारतात गेल्या ३० वर्षापासून जागतिकीकरणामुळे विस्थापनाला खुली सूट मिळाल्याचे दिसून येते. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात ३५० विशेष आर्थिक झोन (Special Economic Zone SEZ) स्थापित करण्याच्या प्रयत्नात हजारो लोकांची जमीन ताब्यात घेतली आणि लाखो लोक विस्थापित झालेले आहेत.

अशाप्रकारे आर्थिक विकासाकरिता मोठमोठे औद्योगिक प्रकल्प, मोठी धरणे, कोळसा, मॅगनीज खाणी, मोठे विद्युत प्रकल्प, थर्मल पावर प्रकल्प इत्यादी उद्योगांसाठी लाखो एकर जमिनी ताब्यात घेतल्या जातात. त्यातून विकास होतो असे भासवून कोणाच्या किती विकास होतो हे प्रत्यक्ष पाहिले जात नाही. परंतु विकासामुळे विस्थापनाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

**४.२.२.५ विस्थापन आणि नागरिकत्व:**

विस्थापित लोकांसाठी नागरिकत्व (किंवा त्याचा अभाव) हा एक महत्त्वपूर्ण मुद्दा आहे. पारंपारिक संकल्पनेप्रमाणे, नागरिकत्व हे दिलेल्या राष्ट्र-राज्यातील राजकीय सदस्यत्व म्हणून पाहिले जाते ज्याद्वारे नागरिकांना नागरी, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अधिकार प्राप्त होतात. तथापि, बहुतेक राज्यांमध्ये त्यांच्यामध्ये असे गट असतात जे राज्याशी संबंधित असतात किंवा नसतात आणि त्यांना नागरिकत्व हक्क नाकारले जातात, जरी त्यांच्याकडे औपचारिक नागरिकत्व असले तरीही. विशेषतः, विस्थापित लोकांना (दोन्ही सीमेच्या आतील आणि सीमा ओलांडून आलेल्या) औपचारिक नागरिकत्व आणि अधिकार नाकारले जातात. परंतु ते हक्कांचा दावा करतात, आणि वेगवेगळ्या मार्गाने ते मिळवण्याचा प्रयत्न करतात. निषेध, हक्क सांगणे आणि आंतरराष्ट्रीय घटकांची मदत हे त्या हक्कांसाठी संघर्ष करण्याचे प्रकट मार्ग आहेत.

**४.२.४ लिंगभाव आणि नागरिकत्व:**

नागरिकत्वाचा अर्थ पाहत असताना टी. एच. मार्शल यांनी नागरिकत्वाची 'राजकीय समुदायाचे परिपूर्ण आणि समान सदस्यत्व' अशी व्याख्या केली आहे हे आपण पाहिले. अशा प्रकारच्या नागरिकत्वामुळे राजकीय समाजाची एक राष्ट्रराज्य म्हणून ओळख प्रस्थापित होते. तसेच राज्यात एक समान राष्ट्रीय संस्कृती आणि सामाजिक वारसा निर्माण होतो. नागरिकत्वामध्ये समानतेच्या तत्त्वाचा पुरस्कार केल्यामुळे संस्कृती, जाती, लिंग, धर्म, वंश इ. आधारांवर असलेल्या भेदभावांचे अस्तित्व नाकारले जाते. राज्याची भूमिका निरपेक्ष व तटस्थ असून ते सर्व नागरिकांना समान वागणूक देते. कोणत्याही आधारावर भेदभाव न करता सर्वांना समान अधिकार असतात  आणि सर्वांना राज्याचे समान संरक्षण प्राप्त होते. ही चर्चा आपण वरील भागात केली. परंतु नागरिकत्वाचे अधिकार वास्तवात स्त्रियांपर्यन्त हे अधिकार पोहचताना दिसत नाहीत.

स्त्रीवाद्यांच्या मते स्त्रियांचा जरी नागरिकत्वाचे अधिकार प्राप्त झालेले असले तरी पुरुषप्रधान संस्कृतीमुळे त्या दुसऱ्यावर अवलंबून असलेल्या दिसून येतात. १९७० च्या दशकापासून स्त्रियांच्या राजकीय सहभागावर आणि स्त्रियांच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास होऊ लागला. त्याआधी, कायद्याच्या नजरेत स्त्रीपुरुषांना समान वागणूक दिली, तर स्त्रियांवर अन्याय होणार नाही, असे काही लोकांचे मत होते. पण महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाल्यांनतर पुरुषांच्या तुलनेत महिलांनी कमी मतदान केल्याचे अभ्यासातून दिसून आले. असे आढळून आले की, स्त्रिया त्यांच्या कुटुंबावर आणि घरांवर अधिक लक्ष केंद्रित करतात  आणि त्यांना राजकारण आणि सार्वजनिक बाबींमध्ये जास्त रस किंवा वेळ नसतो.

काही दशकांपूर्वी जेव्हा कुटुंबांचा आकार लहान होऊ लागला, आणि जास्तीत जास्त स्त्रिया घराबाहेर काम करू लागल्या तेव्हा वरील विश्लेषण लोकांनी अमान्य केले. याबरोबरच असेही दिसून आले की,

मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याऱ्या स्त्रियांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे; परंतु राजकीय अधिसत्तेच्या स्तरावर मात्र त्यांचा सहभाग खूपच कमी आहे. जगभरातील निर्वाचन मंडळातील स्त्रियांची संख्या पन्नास टक्क्यांपेक्षाही कमी आहे. ब्रिटनच्या कॉमन्स सभागृहामध्ये स्त्रियांचा सहभाग पाच टक्क्यांपेक्षा कमी राहिलेला आहे आणि संयुक्त राज्य अमेरिकेच्या प्रतिनिधी सभागृहामध्ये त्यांचा सहभाग मोठ्या मुश्किलीने पाच टक्का आहे. केवळ स्कॅन्डेनेव्हीयन देशांमधील विविध विधानसभांमध्ये स्त्रियांची अवस्था तेवढी बिकट नाही. स्वीडन आणि डेन्मार्कमध्ये स्त्रियांची सदस्यसंख्या सव्वीस टक्के आहे; तर मध्ये चौतीस टक्के आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रात तर स्त्रियांच्या प्रतिनिधित्वाची दशा अधिकच निराशाजनक दिसून येते. उदाहरणार्थ– नोव्हेंबर, १९९० मध्ये नवीन युरोपच्या ऐतिहासिक 'चार्टर ऑफ पॅरिस' वर सह्या करण्यासाठी चौतीस शासनप्रमुख एकत्रित आले. या संम्मेलनामध्ये 'शीतयुद्धां'च्या अंताची घोषणा केली गेली. वर्तमानपत्रांच्या मुख्य बातम्यांमध्ये त्याला 'एका युगाचा अंत' अशी संज्ञा दिली गेली. परंतु स्त्रीवादी असा प्रश्न उपस्थित करतात की, हा कोणत्या युगाचा अंत होता? अगदीच म्हटले तरी हा 'पुरुषसत्तेच्या युगाचा तर अंत नव्हता' या चौतीस शासनाध्यक्षांच्या सामूहिक छायाचित्रांमध्ये जिकडे पाहावे तिकडे गडद रंगाचे सूट घातलेले पुरुषच पुरुष दिसत होते. सूक्ष्मपणे शोध घेतल्यानंतर त्यांमध्ये केवळ दोनच स्त्रिया दिसत होत्या– नॉर्वेच्या प्रधानमंत्री ग्रे बुंटलॅन्ड आणि ब्रिटनच्या प्रधानमंत्री मागरिट थॅचर या सम्मेलनाच्या दोन दिवसांनंतरच मागरिट थॅचरने आपला राजीनामा दिला, आणि त्यांच्या जागी एका पुरुषप्रधान मंत्र्याने मंत्रिपद सांभाळले. याचा अर्थ कायद्याच्या पुस्तकात, राज्यघटनेत स्त्री व पुरूषांना समान अधिकार देण्याचा काय उपयोग आहे?

त्यामुळेच स्त्रीवादी अशी मागणी करतात की, जोपर्यंत सार्वजनिक जीवनामध्ये स्त्रियांच्या समान सहभागाची शर्त पूर्ण होत नाही तोपर्यंत नागरिकत्वाची संकल्पना खऱ्या अर्थाने पूर्ण होऊ शकत नाही. ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे की, भारतामध्ये पंचायतीच्या स्तरावर स्त्रियांसाठी एक–तृतीयांश जागा आरक्षित करून या दिशेने पावले उचलली गेली आहेत. यातून स्त्रियांना स्थानिक पातळीवरील राजकारणात येण्यासाठी प्रोत्साहन मिळेल आणि हळूहळू विधानसभा व संसद यांमध्ये सुद्धा त्यांच्या पर्याप्त प्रतिनिधित्वाची व्यवस्था केली जाऊ शकेल.

## ४.२.४ नागरिकत्वावरील समकालीन चर्चाविश्व (सामाजिक–राजकीय–आर्थिक)

नागरिकत्वाची कल्पना कालांतराने विकसित होत गेली. ऐतिहासिक दृष्ट्या लोकांच्या निष्ठा या सामान्यतः वांशिक गट किंवा सरंजामदारांप्रती होत्या. एकोणिसाव्या शतकामध्ये राष्ट्र राज्याच्या उदयानंतर त्यामध्ये जे राज्याचे आहेत आणि जे राज्याचे नाहीत यांच्यात फरक करण्याची गरज निर्माण झाली. यातूनच नागरिक आणि परदेशी यांच्यात कायदेशीर फरक निर्माण करण्यात आला. बहुतेक देशांनी यासाठी स्वातंत्र्याच्या वेळी राष्ट्रीय संस्था स्थापन केली ज्यामध्ये मूलभूत तत्वे मांडण्यात आली. या संहितेमध्ये कोण राष्ट्राचा नागरिक आहे आणि नागरिकत्व कसे प्राप्त केले जाऊ शकते हे परिभाषित करण्यात आले. यामुळे

मतदान, देशात मुक्त फिरण्याचे क्षमता, आणि काम करण्याची पात्रता यासारख्या अधिकारांचा फायदा नागरिकांना झाला. तसेच कर भरणे इत्यादी जबाबदाऱ्या नागरिकांवर देण्यात आल्या.

नागरिकत्वाबद्दल विविध देशांमध्ये विविध प्रकारे नागरिकत्व मिळवण्याच्या पद्धती अवलंबलेल्या दिसतात. त्याचे सामाजिक राजकीय आणि आर्थिक अन्वयार्थ कालीन चर्चा विश्वाचा भाग होताना दिसतात.

नागरिकत्व हे स्वाभाविक तसेच स्वीकृत अशा दोन प्रकारात विभागता येते. पहिला प्रकारात लोक जन्मतःच राज्याचे नागरिक बनतात तर स्वीकृत नागरिकांना नागरिकत्व मिळवावे लागते. प्रत्येक देशामध्ये या संदर्भात वेगळे नियम दिसून येतात. नागरिकत्वाच्या आधुनिक संकल्पनेमध्ये दोन तत्वांवर आधारित नागरिकत्व पहावयास मिळते. काही देशात जन्म ठिकाण हा नागरिकत्वाचा निकष मानतात या तत्त्वाप्रमाणे जे मूल ज्या देशाच्या भूभागावर जन्माला आलेले असते त्या मनाला त्या देशाची नागरिकत्व मिळते. याचा अर्थ जरी त्या मुलाचे माता-पिता देशाचे नागरिकत्व धारण करत असतील तरी त्या देशाच्या भूभागावर जन्मलेल्या मुलाला त्या देशाचे नागरिकत्व आपोआप मिळते या तत्वाला jus soli असे म्हणतात. दुसरा तत्वात मुलाचा जन्म कुठे झाला असला तरी त्या मुलाचे माता पिता ज्या देशाचे नागरिक असतात त्या देशाचे नागरिकत्व मुलाला मिळते. या तत्वाला jus sanguinis असे म्हणतात. ब्रिटन अमेरिका आणि भारत यासारख्या देशात या दोन्ही तत्वांचे एकत्रीकरण करून ती व्यक्ती नागरिक मानली जाते. ज्याप्रमाणे त्या देशाचे नागरिक असलेल्या माता-पित्याच्या मुलांना नागरिकत्व प्राप्त होते. उदाहरणार्थ भारतात जन्मलेले कोणतेही व्यक्ती तिच्या जन्माच्या वेळी तिच्या आई-वडिलांपैकी कोणीही एक भारताचे नागरिक असल्यास ते जन्माने भारताचे नागरिक होऊ शकते. तसेच भारता बाहेर जन्मलेल्या व्यक्तीला तिच्या आई-वडिलांपैकी कोणीही एक भारताचा नागरिक असेल तर वंशतवाद्वारे त्या व्यक्तीला भारताचे नागरिकत्व मिळू शकते.

स्वीकृत नागरिकत्व हा नागरिकत्व मिळवण्याचा आणखी एक प्रकार आहे या प्रकारात परकीय व्यक्ती काही अटींवर त्या देशाचे नागरिकत्व प्राप्त करू शकते स्वीकृत नागरिकत्व प्राप्त करण्याच्या पुढील काही प्रक्रिया विविध देशांमध्ये आढळून येतात

एखाद्या परकीय स्त्रीने दुसरे एखादा दुसऱ्या देशातील नागरिकाशी लग्न केले तर तिला पतीच्या देशाचे स्वाभाविक नागरिकत्व प्राप्त होते

काही देशांतील कायद्यानुसार परकीय व्यक्तीला त्या देशात सार्वजनिक सेवेत नोकरी मिळाल्यास तिला त्या देशाचे नागरिकत्व प्राप्त होते

बहुतेक सर्व राज्यात परकीय व्यक्तीने नागरिकत्वासाठी अर्ज केल्यास त्या देशाच्या कायद्यानुसार ती व्यक्ती नागरिकत्व प्राप्त करू शकते. परंतु यासाठी विविध देशात विविध अटी बंधनकारक म्हणून घातलेल्या दिसून येतात सर्वसाधारणपणे त्या राज्यातील निवासाचा कालावधी ही अट घातलेली दिसून येते. उदाहरणार्थ इंग्लंडमध्ये नागरिकत्व मिळवण्यासाठी पाच वर्षाचे सलग वास्तव्य ही अट आहे

नागरिकत्वाचा दुसरा राजकीय पैलू असा दिसतो की स्वीकृत नागरिक आणि स्वाभाविक नागरिक यांचे हक्क आणि विशेष अधिकार यांच्यामध्ये प्रत्येक देशात फरक केलेला आढळून येतो. त्यानुसार पूर्ण नागरिकत्व किंवा आवश्यक नागरिकत्व अशी फारकत करण्यात येते. इंग्लंडमध्ये स्वीकृत आणि स्वाभाविक नागरिकांचे हक्क आणि विशेष अधिकार यामध्ये काहीही फरक आढळत नाही. परंतु अमेरिकेमध्ये स्वाभाविक नागरिकांना बहाल करण्यात आलेले काही हक्क आणि विशेष अधिकार स्वीकृत नागरिकांना प्रदान केलेले दिसत नाहीत. उदाहरणार्थ स्वीकृत नागरिक अमेरिकेचे अध्यक्षपद भूषवू शकत नाहीत. या मागचा तर्क असा की, सर्वोच्च पदावरील व्यक्तीच्या देशाविषयीच्या निष्ठा आणि देशभक्ती या स्वाभाविक नागरिकांमध्येच दिसून येतात.

याशिवाय नागरिकत्व कायदे आणि तह यांच्या मार्गाने देखील बहाल केले जाते. Puerto Rico च्या लोकांना अमेरिकेचे नागरिकत्व कायद्याने दिलेले आहे. दोन देशातील तहानुसार एखाद्या देशाला दुसऱ्या देशाचा भूभाग जोडला जातो त्यावेळी त्या देशाचे नागरिकत्व जोडल्या गेलेल्या भूभागावरील लोकांना मिळते. फ्लोरिडा आलास्का आणि कॅलिफोर्निया या राज्यातील लोकांना अमेरिकेचे नागरिकत्व याप्रकारे मिळालेले आहे.

विविध देशांनी विविध नियम लागू केल्याने अनेकदा दुहेरी नागरिकत्वाचे प्रश्न निर्माण झालेले दिसतात. म्हणजेच जर व्यक्तीला Jus soli च्या तत्वानुसार एका देशाचे नागरिकत्व असेल आणि jus sanguinis या तत्वानुसार त्यामुलाचे नागरिकत्व दुसऱ्या देशाचे असेल तर दोन्ही देशांतील संघर्षाच्या वेळी त्या व्यक्तीच्या निष्ठा कोणत्या देशाबरोबर असाव्यात याबद्दल प्रश्न निर्माण होऊ शकतो.

नागरिकत्वाच्या आर्थिक पैलूंचा विचार करताना हे लक्षात घ्यावे लागते कि Jus soli च्या तत्वामध्ये देशाच्या प्रदेशात जन्मलेले मूल आपोआप त्या देशाचे राष्ट्रीयत्व प्राप्त करते. या दृष्टिकोनातून, नागरिकत्वाचे बंध रक्ताच्या नात्याच्या पलीकडे पसरलेले असतात आणि वेगवेगळ्या अनुवांशिक आणि भौगोलिक पार्श्वभूमीच्या लोकांना समाविष्ट करतात. jus sanguinis या तत्त्वावर आधारित प्रकारात मुले त्यांच्या जन्मस्थानाचा विचार न करता त्यांच्या पालकांकडून राष्ट्रीयत्व प्राप्त करतात. नागरिकत्वाचा हा प्रकार अधिक वांशिक आहे आणि व्याख्येनुसार कमी समावेशक आहे.

नागरिकत्व हक्क हे देशाच्या आर्थिक विकासावरही परिणाम करत असतात. नागरिकत्वाचे कायदे हे अधिक समावेशक असल्यास सर्वसमावेशक असल्यास, ते सकारात्मक सामाजिक भांडवल प्रदान करू शकतात, विश्वास वाढवू शकतात, व्यवहार खर्च कमी करू शकतात आणि संघर्षाची संभाव्यता आणि तीव्रता कमी करू शकतात. केवळ jus sanguinis या तत्वाचा स्वीकार केल्यास ते अधिकपणे वांशिकतेवर आधारित असल्याने एकीकरण अधिक कठीण बनवते आणि त्यामुळे आर्थिक विकासाला धक्का बसतो.

तसेच राजकीय अस्थिरता आणि भ्रष्टाचार: नागरिकत्व असलेले अल्पसंख्याक बहुतेकदा ध्रुवीय टोकावर असतात-एकतर आर्थिक जीवनातून वगळले जातात किंवा स्थानिक अर्थव्यवस्थेत असमानतेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. नागरिकत्वाशिवाय, उपेक्षित अल्पसंख्याक लोकशाही मार्गाने मतदान करू शकत नाहीत किंवा सार्वजनिक जीवनावर प्रभाव टाकू शकत नाहीत. वंचित गटांना स्वतःकडे लक्ष वेधण्याचा

एक मार्ग म्हणजे निषेध किंवा हिंसाचार. यामुळे सरकारांना या अल्पसंख्याकांना दडपण्यासाठी प्रोत्साहन मिळू शकते, शक्यतो लष्करी खर्च वाढू शकतो आणि परिणामी वाढ कमकुवत होऊ शकते. याउलट, जेव्हा एखादा गैर-राष्ट्रीय गट आर्थिक जीवनात असमानतेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो, तेव्हा राज्याकडून त्याचे संरक्षण नसणे ही चिंतेची बाब आहे. त्यांच्या असुरक्षिततेमुळे, प्रभावशाली अल्पसंख्याक राजकीय प्रक्रियेवर प्रभाव टाकण्यास प्रवृत्त होतात आणि लाच घेऊ शकतात, ज्यामुळे भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळते आणि संस्था कमकुवत होतात.

अशाप्रकारे नागरिकत्वाचे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक पैलू एकमेकांत गुंतलेले दिसतात. आणि कमी अधिक प्रमाणात ते सर्व ठिकाणी उपस्थित असताना दिसतात.

## ४.३ सारांश :

प्रस्तुत घटकात आपण सामाजिक न्याय आणि नागरिकत्व याबद्दल चर्चा केली. यामध्ये सामाजिक न्यायाचा अर्थ, त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेतली. तसेच सामाजिक न्यायाचे स्वरूप समजून घेताना न्यायाचे सामाजिक राजकीय आणि आर्थिक पैलूंचा अभ्यास केला. विस्थापन आणि नागरिकत्व या संकल्पना समजून घेतल्या व त्यांच्यातील सहसंबंध अभ्यासला. लिंगभाव आणि नागरिकत्व समजून घेताना स्त्रीवाद्यांनी नागरिकत्वावर व पुरुषी राज्यावर केलेली टीका अभ्यासली. व घटकाच्या शेवटच्या भागात नागरिकत्वावरील समकालीन चर्चाविश्वाचा मागोवा घेताना विविध देशांमध्ये नागरिकत्वाबाबतच्या विविध पद्धतींचा अभ्यास केला व त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बाजू पाहिल्या.

## ४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**सामाजिक न्याय :** व्यक्ती-व्यक्ती मध्ये जात, धर्म, वंश, पंथ, वर्ण, जन्मस्थान, लिंगभाव या सामाजिक आधारावर भेदभाव न मानता, प्रत्येक व्यक्तीला विकासाची समान संधी उपलब्ध करून देणे म्हणजे सामाजिक न्याय होय.

**नागरिकत्व :** म्हणजे, अशी अवस्था ज्यामध्ये व्यक्ती विशिष्ट राजकीय समुदायाचा (Political community) पूर्ण व जबाबदार सदस्य असते, आणि सार्वजनिक जीवनामध्ये (Public life) सहभागी होत असते.

**विस्थापन :** लोकांची त्यांच्या घरापासून किंवा मूळ देशातून सक्तीने झालेली हालचाल

**लिंगभाव :** लिंगभाव हा सामाजिक सांस्कृतिक असतो. तो भूमिका, गुण, व जबाबदाऱ्या इत्यादिंची स्त्रियोचीत आणि पुरुषोचीत आशी विभागणी करतो.

**jus soli :** 'right of the soil' साठी लॅटिन शब्द - कायद्याचा नियम ज्यामध्ये मुलाचे नागरिकत्व त्याच्या किंवा तिच्या जन्मस्थानावरून निश्चित केले जाते.

**jus sanguinis :** 'right of blood' साठी लॅटिन शब्द – कायद्याचा नियम की मुलाचे नागरिकत्व त्याच्या पालकांद्वारे निर्धारित केले जाते.

## ४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१) 'क्लासेस इन मॉडर्न मसोसायटी' हा ग्रंथ कोणी लिहिला?

२) नागरिकत्वाचा अर्थ सांगा.

३) Citizenship and Social Class हा ग्रंथ कोणी लिहिला?

४) जोन्स मुरकिन आणि जॉर्ज यांच्या मते विस्थापन म्हणजे काय?

५) स्त्रियांच्या राजकीय सहभागावर आणि स्त्रियांच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास केंव्हा होऊ लागला?

## ४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) 'क्लासेस इन मॉडर्न 'सोसायटी' हा ग्रंथ टॉम बॉटोमोर यांनी लिहिला.

२) नागरिकत्व म्हणजे, अशी अवस्था ज्यामध्ये व्यक्ती विशिष्ट राजकीय समुदायाचा (Political community) पूर्ण व जबाबदार सदस्य असते, आणि सार्वजनिक जीवनामध्ये (Public life) सहभागी होत असते. नागरिक ही अशी व्यक्ती आहे जी राज्यसंस्थे (State) प्रति पूर्ण निष्ठा बाळगत असते व तिला राज्यसंस्थेचे संरक्षण (Protection) प्राप्त होत असते.

३) Citizenship and Social Class हा ग्रंथ टी. एच. मार्शल यांनी लिहिला.

४) जोन्स मुरकिन आणि जॉर्ज यांच्या मते जोन्स मुरकिन आणि जॉर्ज यांच्या मते विस्थापन अशी संकल्पना आहे की विकास प्रकल्पाकरिता लोकांना त्यांच्या मूळ स्थानावरून हलविले जाते.

५) १९७० च्या दशकापासून स्त्रियांच्या राजकीय सहभागावर आणि स्त्रियांच्या  राजकीय वर्तनाचा अभ्यास होऊ लागला.

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

१) सामाजिक न्यायाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

२) नागरिकत्वाची संकल्पना स्पष्ट करा.

३) समान व सार्वत्रिक नागरिकत्व संकल्पना स्पष्ट करा.

४) विस्थापनाचे प्रकार विशद करा.

५) विस्थापन आणि नागरिकत्वातील सहसंबंध स्पष्ट करा.

६) लिंगभाव आणि नागरिकत्व यावर टीप लिहा.

७) नागरिकत्वावरील समकालीन चर्चाविश्वाचा आढावा घ्या.

## ४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


1. Gauba, O. P. (2011) : "An Introduction to Political Theory", MacMillan Publisher, New Delhi.
2. Ramaswamy, Sushila (2015) : "Political Theory : Ideas and Concepts", PHi Learning Private Ltd., Delhi

३. डोळे, ना. य. (२००९): राजकीय विचारांचा इतिहास, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

४. चौसाळकर, अशोक (२०१७) : आधुनिक राजकीय सिद्धांत, युनिक अकॅडमी, पुणे

५. देव, विजय, गोसावी शरद, आपटे संज्योत, (२०१५) राजकीय संकल्पना आणि सिद्धांत, डायमंड पब्लिकेशन, पुणे.


❑❑❑